**पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए.नं.३२/२०१७**
**निशाणी ७ च्या खाली.**

**<u>शपथेवर पुढील सरतपास अर्जदारातर्फे ॲड. श्री. सी.बी.सुपनर :—</u>**

८. शपथपत्रातील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदर शपथपत्रास यापुर्वीच निशाणी क्रमांक ०७ दिलेला आहे. अदखलपात्र गुन्हयातील प्रथम खबरी अहवालास **<u>नि.क्र. १०</u>** देण्यात येते. एल.ए.आर.नं. १०७६/२०१४ या प्रकरणातील नि.क्र. १च्या प्रमाणित प्रतीस नि.क्र. ११ देण्यात येते.

**<u>उलटतपास गैरअर्जदारातर्फे ॲड. श्री.आर.व्ही.मोटे :—</u>**

९. मी वाकवड येथे माझया जन्मापासून राहते. मी व माझया मुलीने बिभीषण याच्या मिळकतीचे वाटप होवून मिळण्यासाठी याच न्यायालयात दावा दाखल केलेला आहे व तो प्रलंबीत आहे. बिभीषण याने त्याच्या मुलांना जमीन वाटून दिल्यावर फेरफार घेण्यासाठी सुरु असलेल्या प्रकरणामध्ये मी तहसीलदार यांच्यासमोर सदर फेरफारला आक्षेप घेतलेला आहे. तहसीलदार यांनी निकाल देवून फेरफार मंजुर केलेला आहे. त्या निकालाविरुध्द मी उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. माझयामध्ये व गैरअर्जदार याच्यामध्ये जमीनीबाबत वाद आहे. हे खरे नाही की, आशाबाई ही माझी मुलगी आहे. हे खरे आहे की, तिचा विवाह भवानवाडी येथील सचिन ठोंबरे यांच्या सोबत झालेला आहे. साक्षीदार सांगतात की, आशाबाई ही माझी मुलगी नसुन ती माझया बहीणीची मुलगी आहे. बिभीषण यास रामदास हा भाउ आहे. हे खरे आहे की, तलावासाठी संपादित केलेल्या जमीनीबाबत दाखल प्रकरणातील आवश्यक ती कार्यवाही रामदास करत असे. गैरअर्जदार क्र १ व २ यांच्या आईचे नाव सिंधुबाई असे आहे. सिंधुबाई बिभीषण याची लग्नाची पत्नी होती. तिचा मृत्यू दहा ते बारा वर्षापूर्वी झालेला आहे.

१०. केज तालूक्यातील माळेवाडी हे गाव मला माहिती नाही. हे खरे नाही की, माझे लग्न तीस ते पस्तीस वर्षापूर्वी माळेवाडी येथील मुकुंद हाके याच्यासोबत झालेले आहे. हे खरे नाही की, मला मुकुंद हाके याच्यापासून आशाबाई व प्रियंका या दोन मुली झालेल्या आहेत.

११. मी व गैरअर्जदार हे स्वतंत्र राहतो. गैरअर्जदार क्र १ व २ हे जमीन मला देत नाहीत एवढाच माझयामध्ये व त्यांच्यामध्ये वाद आहे. हे खरे नाही की, जमीन न देण्याशिवाय इतर कोणताही त्रास गैरअर्जदार यांनी मला दिलेला नाही. हे खरे नाही की, माझे व बिभीषण मासाळ याचे सोहळा ते सतरा वर्षापूर्वी लग्न झालेले आहे हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, मला बिभीषण याच्यापासून कोणतीही संतती झालेली नाही. हे खरे नाही की, गैरअर्जदार यांच्याकडून जमीन मिळण्याची कोणतीही आशा उरली नसल्यामुळे मी सदरचा खोटा अर्ज गैरअर्जदारांच्या विरुध्द दाखल केलेला आहे. हे खरे नाही की, माझे व गैरअर्जदारांचे एकत्र कुटुंब नाही. हे खरे नाही की, मला गैरअर्जदार क्र १ व २ यांनी कोणत्याही प्रकार त्रास दिलेला नाही. हे खरे नाही की, बिभीषण याच्या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. हे खरे नाही की, गैरअर्जदार यांच्यामुळे माझे कोणतेही प्रकारचे नुकसान झालेले नाही.

१२. मी सध्या शेतात काम करते. मला भाउ नाही. मला आई आहे ती गावात राहते. आमच्या वडीलांना जमीन नाही. साक्षीदार सांगतात की, त्यांनी विकून टाकली. मी माझा उदरनिर्वाह शेतात काम करुन करते. मला व माझया मुलीला कोणताही आजार नाही. हे खरे नाही की, मला व माझया मुलीला दरमहा ११०००/— रुपयांची गरज नाही. गैरअर्जदार यांना जमीनीशिवाय कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. हे खरे नाही की, गैरअर्जदार यांची परिस्थिती चांगली नाही. गैरअर्जदार यांचे लग्न झालेले आहे. हे खरे नाही की, मी खोटा अर्ज दाखल करुन खोटे शपथपत्र देवून आज रोजी खोटी साक्ष देत आहे. मी साक्षीदार म्हणून कोणाला तपासणार आहे हे सांगू शकत नाही. हे खरे नाही की, मी या अर्जासोबत खोटे कागदपत्र दाखल केलेले आहेत.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर निवेदन स्विकृत/समक्ष

(डी.आर.माळी)

दिनांक :— ११/१०/२०१८ सह दि.न्या.क.स्तर, भूम.